REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2023

# ''हिंगणघाट शहरातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयी: एक अभ्यास''

प्राचार्य डॉ. माणिक मारोतराव जोगवे
आर.बी. एम. अध्यापक महाविद्यालय, हट्टा,ता. वसमत, जि. हिंगोली



अभ्यास कसा करावा? हा प्रश्न विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. अभ्यास करणे म्हणजे केवळ कठीण परिश्रम नसून ते एक शास्त्र आहे. 'एक कला आहे' प्रत्येक विद्यार्थ्याला हे शास्त्र शिकविले पाहिजे आणि विद्यार्थ्यांनी ते शिकले पाहिजे. त्यामुळे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांचे परिश्रम, धन, वेळ व आरोग्य यांचा अपव्यय वाचून जीवन आनंदमय व यशस्वी होईल. विद्यार्थ्यांच्या जीवापाड प्रयत्नाला यशाचा सुगंध येईल.

अभ्यास म्हणजे एखादा विषय मुळापासून समजून घेवून त्या विषयाशी संबंधित अधिकाअधिक माहिती मिळविणे आणि त्या माहितीचे उपयोजन जाणून घेणे.

समोर पुस्तके ठेवून फक्त वाचन करणे किंवा वर्गपाठ, गृहपाठ लिहणे म्हणजे अभ्यास नसतो. प्रश्नपत्रिका सोडविणे किंवा नोट्स काढणे म्हणजे ही अभ्यास नव्हे.

अभ्यास ही एक प्रक्रिया असून त्यात वाचन, लेखन, स्मरण, मनन, चिंतन आणि उपयोजन या सर्व बाबींचा समावेश असतो. तुम्ही एखादया विषयाचा अभ्यास करता म्हणजे त्या विषयाच्या सदंर्भात अधिकाअधिक माहिती मिळवून त्या माहितीचे उपयोजन शोधण्याचा प्रयत्न करणे.

अगदी तसेच आपल्या अभ्यासाच्या वेळा ही नियमित असायला हव्यात आपल्या मेंदुचे स्वत:चे असे एक घडयाळ असते. त्याला सर्व गोष्टी हया घडयाळाप्रमाणे वेळेवर हव्यात असे वाटत मग तो थकत नाही की कुरकुरही करत नाही.

अशाप्रकारे विद्यार्थ्यांनी वाचन, लेखन, स्मरण, चिंतन, मनन हे नियमित आणि नियोजनपुर्वक केल्यास त्यांना अभ्याससवयी हया वाढवता येईल.

## संशोधन समस्येची गरज:—

१. शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी संबंधित संशोधनाची गरज आहे.
२. विद्यार्थ्यांना योग्य अभ्याससवयी लावून त्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी संबंधित संशोधनाची गरज आहे.
३. विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती वाढविण्यासाठी संबंधित संशोधनाची गरज आहे.
४. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक ध्येय पुर्ण करण्यात मदत करण्यासाठी संबंधित संशोधनाची गरज आहे.
५. विद्यार्थ्यांना अभ्याससवयी लावून त्यांची बौधिक क्षमता वाढविण्यासाठी संबंधित संशोधनाची गरज आहे.

६. शालेय गळतीचे प्रमाण थांबविणे
७. विद्यार्थ्यांना अभ्याससवयी लावून त्यांचा आत्मविश्वास वाढविणे.

**संशोधन समस्येचे महत्व:—**

१. शैक्षणिक गुणवत्ता संवर्धन करणे.
२. विद्यार्थ्यांना अभ्याससवयी लावून त्यांची बौध्दिक क्षमता वाढविणे.

**संशोधन समस्येचे विधान :—**

''हिंगणघाट शहरातील माध्यमिक स्तरावरील इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी एक अभ्यास.''

**संशोधनाची उदिष्टये:—**

१. विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा अभ्यास करणे.
२. विद्यार्थ्यांना नियमित व नियोजन पुर्वक अभ्यास करण्याची सवय लावणे.
३. विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा त्यांच्या तुलनात्मक पातळीवर होणारा परिणाम जाणणे.

**संशोधन समस्येची गृहितके:—**

१. अभ्यास सवयी लागल्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
२. विद्यार्थ्यांला एखादया विषयावरील काठिण्यता (अवघड) भाग न समजल्यामुळे विद्यार्थ्यी त्या विषयाचा अभ्यास करित नाहीत.
३. एखादया विषयाचे शिक्षक न आवडल्यामुळे विद्यार्थी त्या विषयाचा अभ्यास करित नाहीत.
४. विद्यार्थ्यांना नियोजन पुर्वक अभ्यास सवयी लावता येतात.

**संशोधन समस्येची परिकल्पना:—**

१. विद्यार्थ्यांच्या अंगी वेगवेगळया अभ्याससवयी असतात. हया भिन्न स्वरूपात आहेत.
२. विद्यार्थ्यांच्या अभ्यास सवयीचा ज्ञानात्मक पातळीवर परिणाम दिसतो.
३. अभ्यास सवयीचा दैनंदिन संपादुकीनीकवर फारसा प्रभाव पडत नाही.

**संशोधन समस्येतील तांत्रिक शब्दांचा कार्यात्मक व्याख्या:—**

**हिंगणघाट :**

महाराष्ट्र राज्यातील वर्धा नदीकाठावर वसलेले वर्धा जिल्हयातील एक सर्वात मोठा तालूका आहे.

**माध्यमिक शाळा :—**

''इयत्ता आठवी ते दहावी या वर्गाच्या समावेश माध्यमिक शाळेत करण्यात आला आहे. की ज्यामध्ये वय वर्षे १३ ते १६ वर्षाच्या बालकांचा समावेश करण्यात आला आहे.''

शालेय व्यवस्थापन शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह, किरण नागतोडे पृष्ठ क्र. ३९२

**विद्यार्थी :—**

''ज्ञान ग्रहण करणारा असा तो विद्यार्थी.''

**इयत्ता नववी :—**

''महाराष्ट्र शासनाच्या अभ्यासक्रमानूसार इयत्ता नववी म्हणजे माध्यमिक शिक्षणाची पहिली इयत्ता शालांत पुर्व इयत्ता होय''

**अभ्यास सवयी :—**

एखादी गोष्ट पुन्हा पुन्हा करणे यालाच अभ्याससवय असे म्हणतात.

संत कबीर, अभ्यास कसा करावा.

**अभ्यास :—**

''अभ्यास हा निरंतर, दिर्घकाळ श्रध्दापूर्वक केले जाणारे कार्य आहे.

संत कबीर, अभ्यास कसा करावा, पृष्ठ क्र. १५

**न्यादर्श :—**

संबंधित संशोधनासाठी संशोधकाने हिंगणघाट शहरातील माध्यमिक शाळाची निवड केलेली असून त्यापैकी एका शाळेतील इयत्ता ९वी च्या विद्यार्थ्यांपैकी तुकडी 'अ' चे व तुकडी 'ब' चे प्रत्येकी १० विद्यार्थी आणि दुसऱ्या शाळेतील इयत्ता ९ वी च्या विद्यार्थ्यांपैकी तुकडी 'अ' चे व तुकडी 'ब' चे प्रत्येकी १० विद्यार्थी असे एकूण ४० विद्यार्थी हे यादृच्छिक नमुना निवड पध्दतीतील लॉट्री पध्दतीने निवडले आहेत.

**संशोधनाची पध्दती:—**

संशोधनाचे कार्य करण्यासाठी समस्येचे स्वरूप लक्षात घेऊन सेर्वेक्षण पध्दतीची निवड केले आहे.

**संशोधनाची कार्यवाही:—**

संबंधित संशोधन कार्यामध्ये संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीद्वारे विद्यार्थ्यांना प्रश्नावली देऊन माहितीचे संकलन करण्याचे ठरविले आहे. मिळालेल्या माहितीचे पध्दतशीर संकलन करून संशोधनाच्या उद्दिष्टानुसार माहितीचे विश्लेषण करण्यात आले आहे. माहितीच्या विश्लेषनानूसार अर्थनिर्वचन करण्यात आले आहे.

**संशोधनाची साधने :—**

प्रस्तुत संशोधन कार्य करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड केली आहे. म्हणून संशोधकाने माहिती संकलीत करण्यासाठी संशोधनाच्या प्रश्नावली या साधनांची निवड केलेली आहे.

**सांख्यकीय परिमाणे:—**

संशोधकाने सांख्यकीय परिमाण म्हणून शेकडेवारी व आलेख, या परिमाणाचा उपयोग संबंधित संशोधनासाठी करण्यात आला आहे.

**निष्कर्ष:—**

१. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे अभ्यासाचे नियोजन करतात.
२. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे नियमित रोज दोन तास अभ्यास करतात.
३. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे वाचन पध्दतीने अभ्यास करतात.
४. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे अभ्यासाचे वेळापत्रक आखतात.
५. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे कठीण विषयासाठी अभ्यासाच्या वेळापत्रकात जास्त वेळ देतात.
६. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे संदर्भग्रंथाचा वापर करतात.
७. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र वही वापरतात.
८. जास्तीत—जास्त विद्यार्थी हे न समजलेल्या मुदयांची नोंद ठेवतात.
९. जास्तीत—जास्त विद्यार्थ्यांनी त्यांचे अभ्यास मंडळ तयार केलेले नाहित.
१०.जास्तीत—जास्त विद्यार्थ्यांना शिक्षकांनी वर्गात सगळयांच्या समोर रागावल्यावर राग येत नाही.
११.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे अभ्यासासाठी शिकवणीवर अवलंबून असतात.
१२.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे अध्यापनात पालकांची मदत घेतात.

१३.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे शाळेतील परिक्षा व निकाल यांचा विचार करून अभ्यास करतात.
१४.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे सकाळी वाचन व रात्री लेखन असे नियम पाळतात.
१५.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे शिक्षकांकडून अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन घेतात.
१६.जास्तीत—जास्त विद्यार्थी हे अभ्यासात अवघड विषयांना प्राधान्य देतात.

## संदर्भ ग्रंथसूची:—

१. आगलावे, प्रदिप., (२०००), संशोधन पध्दती आणि तंत्रे, विद्याप्रकाशन, नागपूर.
२. बापट, भा.गो., (१९८८), शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे.
३. भितांडे, वि.रा., (२००६), शैक्षणिक संशोधन पध्दती, नित्य नूतन प्रकाशन पुणे.
४. दांडेकर,वा.ना.,(२००४),शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, विद्या प्रकाशन,पुणे.
५. दुनाखे, अरविंद.,(१९९७), प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, नित्यनुतन प्रकाशन, पुणे.
६. नागतोडे, किरण., (१९९७), शालेय व्यवस्थापन, शैक्षणिक सरंचना व आधुनिक विचार प्रवाह, विद्याप्रकाशन, पुणे.
७. टेकाळे, आर. व्हि,पाईकराव, विजयकुमार., (२००७), प्राथमिक स्तरावरील शिक्षण व शिक्षकाची कार्य, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक.